सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

पहिला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ३० ऑगस्ट २०१६

**नगरपरिषदा व नगरपंचायत निवडणुकांसाठी दोन टप्प्यांमध्ये**
**२६ सप्टेंबर व १० ऑक्टोबरला प्रारूप मतदार यादीची प्रसिद्धी**

प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी १२ दिवस

मुंबई, दि. ३०: राज्यातील १६९ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी २६ सप्टेंबर २०१६ रोजी; तर ४५ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १० ऑक्टोबर २०१६ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील, त्यानंतर त्यावर १२ दिवसांपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे केली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, राज्यातील ४ नगरपंचायतींसह १९१ नगरपरिषदांच्या डिसेंबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत मुदती संपत आहेत; तसेच ३ नगरपरिषदा आणि १६ नगरपंचायतींची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. अशा एकूण २१४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकासांठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. हा कार्यक्रम दोन टप्प्यांत असून पहिल्या टप्प्यात मुदती संपणाऱ्या १५१ व १८ नवनिर्मित नगरपरिषदा व नगरपंचायतींचा समावेश आहे. दुसऱ्या टप्प्यात १ नवनिर्मित नगरपरिषदेसह मुदती संपणाऱ्या ४४ नगरपरिषदा व नगरपंचायतींचा समावेश आहे.

पहिल्या टप्प्यात पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, अहमदनगर, जालना, परभणी, हिंगोली, बीड, उस्मानाबाद, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशीम, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या २६ जिल्ह्यांतील एकूण १६९ नगरपरिषदा व नगरपंचायतींचा समावेश आहे. त्यांच्या निवडणुकांसाठी २६ सप्टेंबर २०१६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होईल. त्यानंतर या यादीवर ७ ऑक्टोबर २०१६ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी प्रभानिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल, असे त्यांनी सांगितले.

दुसऱ्या टप्प्यात पुणे, औरंगाबाद, नांदेड, लातूर, नागपूर, भंडारा आणि गोंदिया या ७ जिल्ह्यांतील एकूण ४५ नगरपरिषदा व नगरपंचायतींचा समावेश आहे. त्यांच्या निवडणुकांसाठी १० ऑक्टोबर २०१६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होईल. त्यानंतर या यादीवर २१ ऑक्टोबर २०१६ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. २९ ऑक्टोबर २०१६ रोजी प्रभागनिहाय अंमित मतदार यादी प्रसिद्ध होईल, अशी माहितीही श्री. सहारिया यांनी दिली.

०-०-०

(Jagdish More, SEC, PRO)